पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **२२/०९/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२२/०९/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.मंगला अशोक कदम
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) द्वितीय एशियन रोलबॉल चॅम्पियनशिप २०१६ बॅकॉक, थायलंड करीता कु.संजना विवेक फाळके हिने स्वत: खर्च केलेली रक्कम त्यांना अदा करणेबाबत.

विषय क्र.२) ७ वी एशियन योगा स्पोर्टस् चॅम्पियनशिप २०१७ सिंगापूर करीता कु.श्रेया शंकर कंधारे हिने स्वत: खर्च केलेली रक्कम त्यांना अदा करणेबाबत.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड मनपा ३५ वा वर्धापनदिन २०१७ अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४) महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत

विषय क्र.५) शासकीय जिल्हास्तर शालेय रोलबॉल, डॉजबॉल व सिकई मार्शट आर्ट २०१७ या ३ स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.६) प्रभाग क्र.१८ चिंचवड येथील शाळेतील फेरबदल करणेबाबत – मा.राजू बनसोडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) कै.धोंडीबा गणपत फुगे मैदान, दिघीरोड, विरंगुळा केंद्र, व्यायामशाळा, संपुर्ण क्रिडांगण सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०८/०९/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५६ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २२/०९/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१७४/२०१७, दि.१३/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कु.संजना विवेक फाळके हिची दिनांक २१/११/२०१७ ते दि.२५/११/२०१७ रोजी झालेल्या द्वितीय एशियन रोलबॉल चॅम्पियनशीप २०१६ बँकॉक, थायलंड करीता निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहून झालेला खर्च र.रु.७५,०००/- च्या ७५% र.रु.५६,२५०/- (अक्षरी र.रु.छप्पन्न हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५७ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २२/०९/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/२०२/२०१७, दि.१४/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कु.श्रेया शंकर कंधारे, निगडी, पुणे ४४ हिने ७ वी एशियन योगा स्पोर्टस् चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर या स्पर्धेस जाऊन आल्याने तिने या कामी स्पर्धा खर्च योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेस र.रु.७०,०००/- स्वत: दिल्याने मनपा नियमानुसार र.रु.७०,०००/- च्या ७५% र.रु.५२,५००/- (अक्षरी र.रु.बावन्न हजार पाचशे फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५८ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २२/०९/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/१०१५/२०१७, दि.२२/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपा ३५ वा वर्धापनदिन २०१७ अनुषंगाने स्पर्धेतील विजेत्या/उप विजेत्या खेळाडूंना बक्षीस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, मानचिन्हे, कॅप, खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धा प्रसंगी अधिकारी, पाहुणे, कर्मचारी यांना चहापान व अल्पोपहार, क्रीकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन, क्रीकेट स्पर्धेत सहभागी (महिला व पुरुष) खेळाडूंसाठी ट्रॅक पँट, टी शर्ट, बॉल खरेदी इ.कामी प्रस्तावात नमुद प्रमाणे र.रु.५,५५,५५०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व स्पर्धेतील विजेत्या/उप विजेत्या खेळाडूंना बक्षीस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, मानचिन्हे, कॅप, खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, क्रीकेट स्पर्धेत सहभागी (महिला व पुरुष) खेळाडूंसाठी ट्रॅक पँट, टी शर्ट, बॉल इ.ची खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदरचा खर्च “ क्रीडा निधी, मनपातर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य खरेदी ” या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २२/०९/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३६९/२०१७, दि.२२/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पुणे जिल्हा रोलबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने माहे ऑक्टो./नोव्हें. २०१७ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटींग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५,००,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च रक्कम रु.५,००,०००/- मधील स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था खर्च एकूण र.रु.७४,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग, संबंधीत क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.३,८६,०००/- हा क्रीडा विभागाचे “ महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा ” या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी

समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६० विषय क्रमांक - ०५

दिनांक - २२/०९/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/१०१४/२०१७, दि.२२/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.जिल्हा क्रीडा अधिकारी ,पुणे यांचे पत्र क्र..जि.क्री.अ./शा.क्री.स्प./सुफट/मैदान मागणी/२०१७-१८/का-४दि.२९ जुलै २०१७ च्या पत्रानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने,शासकीय जिल्हास्तर शालेय रोलबॉल, डॉजबॉल व सिकई मार्शल आर्ट या ३ स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन पद्धतीने करणे, पाहुणे सत्कारार्थ बुके खरेदी, आयोजनाचा खर्च र.रु.३५,२००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१७-१८ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी - वार्षिक स्पर्धा क्रीडा कला तरतूद र.रु.२०,००,०००/- या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच जिल्हास्तर शालेय रोलबॉल, डॉजबॉल व सिकई मार्शल आर्ट २०१७-१८ अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६१ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २२/०९/२०१७

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.राजू बनसोडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१८ चिंचवड येथील नियोजित ६ व्यायामशाळा असून त्यातील तानाजीनगर, केशवनगर, माणिक कॉलनी, या ३ व्यायामशाळा बंद करुन सदर व्यायामशाळेची जागेचा वापर अन्य क्रीडा प्रकारासाठी करण्यात यावा. उदा. बॉक्सिंग, टेबल-टेनिस, वेटलिफ्टिंग इ.बंद केलेल्या व्यायामशाळेतील साहित्य प्रभागातील अन्य व्यायामशाळेमध्ये हलवावे म्हणजे त्या व्यायामशाळेतील सभासदांना त्याचा लाभ घेता येईल. वरील प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६२ विषय क्रमांक - ०७

दिनांक - २२/०९/२०१७

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.धोंडिबा गणपत फुगे मैदान, दिघीरोड, प्रभाग क्र.०७ मध्ये विरंगुळा केंद्र व्यायामशाळा, संपुर्ण क्रीडांगण “ सह्याद्री स्पोर्टस् फौंडेशन ” या संस्थेला ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर संपुर्ण क्रीडांगण, व्यायामशाळा, विरंगुळा केंद्र चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )

**सभापती**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/११५१/२०१७

दिनांक : २५/०९/२०१७



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc